# आठ दिवसांनंतर इगतपुरीत पावसाचे जोरदार आगमन

**घोटी । वार्ताहर**

इगतपुरी तालुक्यात आठ दिवसांपासून वरुणराजाने विश्रांती घेतली होती. त्यामुळे भात आवण्या रखडल्या होत्या. मात्र कालपासून पावसाने पुन्हा जोरदार आगमन केल्यामुळे भात आवण्यांना वेग आला आहे.

गतवर्षीच्या तुलनेत यावर्षी जवळपास ७० टक्के आवण्या झाल्या आहेत. तर गतवर्षी फक्त ५० टक्के आवण्यांची लागवड झाली होती. दरम्यान, मे महिन्यापासूनच पडत असलेल्या पावसामुळे तालुक्यातील सर्व धरणे काठोकाठ भरून वाहत आहेत. तर दारणा, भावली, भाम, वाकी या धरणांमधून विसर्ग सुरू



असून सर्वाधिक मोठे असलेले मुकणे धरणदेखील ८२ टक्के भरले आहे.

गतवर्षी इगतपुरी तालुक्यातील पाऊस हा दोन ऑगस्टपर्यंत १५३७ मि.मी. झाला होता.

३४०० मि.मी.ची सरासरी असलेल्या तालुक्यामध्ये आतापर्यंत ६६ टक्के पाऊस झाल्याची नोंद झाली आहे.

> इगतपुरी तालुक्यात गेल्या आठ दिवसांपासून पावसाने विश्रांती घेतल्यानंतर दोन दिवसांपूर्वी पुन्हा जोरदार सुरू झाल्याने भावली, वाकी, दारणा या धरणांमधून विसर्ग सुरू करण्यात आला आहे. गेल्या वर्षी या तारखेला तालुक्यातील चारही धरणांमध्ये कमी पाणीसाठा होता. मात्र यावर्षी सर्व धरणे १०० टक्के भरले असून सर्व धरणांमधून विसर्ग सुरू आहे.

त्यामुळे अजून ऑगस्ट, सप्टेंबर हे महिने बाकी असल्याने पूर्ण शंभर टक्के पाऊस होणार असल्याची माहिती संबंधित विभागाने दिली आहे.

# विद्यार्थ्यांमध्ये रस्तासुरक्षा जनजागृती महत्वाची : चौधरी



**इगतपुरी ।** विद्यार्थ्यांना रस्ते सुरक्षेचे शिक्षण दिल्यास तरुण जीवांचे रक्षण होईल. त्यामुळे ठाणे आणि नाशिकमध्ये अडीच हजारहून अधिक विद्यार्थ्यांमध्ये 'मिशन सुरक्षा' उपक्रमाद्वारे सुरक्षाविषयक जागृती करण्यात येत आहे, असे प्रतिपादन इगतपुरी हायवे प्रायव्हेट लिमिटेडचे प्रकल्पप्रमुख हेमंतकुमार चौधरी यांनी केले इगतपुरी शहरातील नुतन मराठी शाळेत इगतपुरी हायवे प्रायव्हेट लिमिटेडच्या वतीने 'मिशन सुरक्षा' अंतर्गत रस्ते सुरक्षा जनजागृती अभियान उपक्रम राबविला त्या प्रसंगी हेमंतकुमार चौधरी बोलत होते. या उपक्रमात तीनशेहून अधिक शालेय विद्यार्थीनींनी सहभाग नोंदवला. या प्रसंगी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण प्रकल्प अंमलबजावणी युनिटचे प्रकल्प संचालक श्रीकांत ढगे, नाशिक पोलीस उपअधीक्षक कुमुद कदम, शहापूरचे पोलीस उपअधीक्षक मिलिंद शिंदे, महामार्ग सुरक्षा पथकाचे पोलीस निरीक्षक राम व्होंडे, अर्पित तिवारी, एकता मेस्त्री, नूतन मराठी शाळेचे मुख्याध्यापक श्रीमती गायकवाड, शिंदे सर, उपमुख्यध्यापक प्रसाद चौधरी, शालेय समितीचे अध्यक्ष हेमंत सुराणा उपस्थित होते. सूत्रसंचलन अविनाश कुलकर्णी यांनी केले.

# श्रावणी सोमवारी त्र्यंबक मंदिर पहाटे चारला उघडणार

**त्र्यंबकेश्वर । प्रतिनिधी**

श्रावण महिन्यासाठी त्र्यंबकेश्वर देवस्थान ट्रस्ट सज्ज झाले असून येत्या श्रावणी सोमवारी (दि.२८) मंदिर पहाटे चार वाजता उघडणार आहे. ते रात्री नऊ वाजेपर्यंत सुरू राहणार आहे. प्रत्येक श्रावणी सोमवारी १७ तास मंदिर सुरू राहील. तर इतर दिवशी मंदिर पहाटे पाच ते रात्री ९ या वेळेत सुरू राहील. सर्व भाविकांसाठी गर्भगृह दर्शन बंद राहणार आहे.

धर्म दर्शन मोफत दर्शन पूर्व दरवाजाने सुरू राहील तर देणगी दर्शन महादरवाजाने सुरू होईल. यासाठी नियोजित रांगेतूनच यात्रेकरू भाविकांना मंदिरात सोडण्यात येणार आहे. रांगेत शुद्ध पाण्याची व्यवस्था तसेच प्राथमिक आरोग्य कक्ष सुविधा आहे.

# संत सावता माळी महाराज पुण्यतिथी

**त्र्यंबकेश्वर । प्रतिनिधी**

श्री संत शिरोमणी सावता माळी महाराज पुण्यतिथीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन माळी समाज बांधवांनी केले होते. यावेळी मंदिर बांधण्याचा संकल्प केला.

येथील माळी समाजबांधवांनी सवाद्य पालखी मिरवणूक काढली. त्र्यंबकेश्वर मंदिरात दर्शन व प्रदक्षिणा सोहळा झाला.

कुशावर्त तीर्थावर प्रतिमा व पालखीपूजन, आरती झाली. याप्रसंगी माळी समाजातील महिला भगिनींची संख्या लक्षणीय होती. पालखी सोहळ्यासाठी श्री त्र्यंबकेश्वर देवस्थान ट्रस्टने सहकार्य केल्याबद्दल देवस्थानचे आभार मानले.

# सशुल्क दर्शन तिकिटांचा काळा बाजार करणारी टोळी गजाआड

**त्र्यंबकेश्वर । प्रतिनिधी**

त्र्यंबकेश्वर देवस्थानची ऑनलाईन पास सिस्टिम सदोष असल्याचे लक्षात घेत ऑनलाईन तिकिटे काढून त्या तिकिटांचा काळा बाजार करत महागड्या दराने बाहेरगावहून आलेल्या यात्रेकरू भाविकांना विकणाऱ्या टोळीला त्र्यंबकेश्वर पोलिसांनी गजाआड केले आहे.

पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या संशयितांमध्ये दिलीप नाना झोले (रा. पेगलवाडी), सुदाम राजू बदादे (रा. पेगलवडी), समाधान झुंबर चोथे (रा.रोकडेवाडी), शिवाराज दिनकर आहेर (रा. त्र्यंबकेश्वर), मनोहर मोहन शेवरे (रा. रोकडेवाडी) यांचा समावेश आहे.

याबाबत त्र्यंबकेश्वर येथे पत्रकार परिषदेत घेत डीवायएसपी वासुदेव देसले यांनी माहिती देताना सांगितले की, संशयितांनी १६४८ पास काढून आतापर्यंत पाच हजार भाविकांना तिकीट सातशे ते हजार रुपये अशा चढ्या भावाने विकल्याचे दिसून आले आहे. गत सहा महिन्यांत हे बनावट पास विकले गेले. एका पासवर तीन-



चार जणांची नावे घेत तिकीट काढले जात होते. संशयित स्वतःच्या खासगी मोबाईलमध्ये डायरेक्ट खटल ग्रुप काढून त्याद्वारे ऑनलाईन तिकिटांची त्र्यंबकेश्वर मंदिर परिसरात विक्री करत, असे पोलिसांनी सांगितले.

पेड दर्शन सुविधेत भाविकांना ऑनलाईन तिकिटे मिळत नाहीत तसेच तिकीट मंदिर परिसरात २०० रुपयांऐवजी ७०० ते १००० रुपयांना भाविकांना विक्री केली जात असल्याची चर्चा झाल्यानंतर देवस्थान ट्रस्टने याबाबत पोलिसांना पत्र पाठवून होत असलेल्या गैरप्रकाराची चौकशी करण्याचे आवाहन केले होते. देवस्थान ट्रस्टचे पदसिद्ध अध्यक्ष अतिरिक्त सत्र न्यायाधीश सचिन भन्साळी यांच्या पत्राची पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांनी गंभीर दखल घेऊन त्र्यंबकेश्वर पोलिसांना तपास करण्याच्या सूचना दिल्या होत्या. पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारे याचा शोध पोलीस उपविभागीय अधिकारी वासुदेव देसले यांच्या मार्गदर्शनाखाली घेतला. पोलीस निरीक्षक महेश कुलकर्णी व सहकारी यांनी तपास केला. ऑनलाईन पाच हजार तिकिटे काढले जातात तर ऑफलाईन दोन हजार तिकिटे काढली जातात. असा सात हजार तिकिटांचा कोटा मंदिर ट्रस्टचा आहे. ऑफलाईन पद्धतीने ही तिकिटे काढलेली नव्हती तर ऑनलाईन पद्धतीने (उणीव शोधत) ही तिकिटे काढलेली होती. बनावट नावे व पत्ता, बनावट ओळखपत्र क्रमांक, नंबर वापरून ही तिकिटे आरोपी मोबाईलद्वारे तयार करत होते. मुख्य आरोपीने पोलिसांना पत्रकारांसमोर मोबाईलवर बनावट पास काढण्याचे प्रात्यक्षिक अवघ्या तीन मिनिटांत करून दाखवले. आरोपी खूप शिकलेले नसताना त्यांनी मोबाईलचा वापर केला. संशयित पाच आरोपी हे युवक असून त्र्यंबक परिसरातील आहेत. गर्दीमध्ये ज्यांना तिकीट काढण्यास वेळ नाही असे लोक अथवा गरजू भाविक शोधून त्यांना ही तिकिटे विकली जात होती. २०० रुपयांचे एक तिकीट हजार रुपयांपेक्षा अधिक किमतीत विक्री करत होते.

> **पोलिसांची देवस्थानला सूचना**
>
> पेड दर्शनासाठी तिकिटे ऑफलाईन आणि ऑनलाईन वितरण करताना यंत्रणेतील त्रुटी शोधून त्या तज्ज्ञांच्या सल्ल्याने दूर कराव्यात, अशी सूचना ट्रस्ट मंडळाला पोलिसांनी केली आहे.

